# विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

## –निवीदा मागविणे बाबत–

**विषय:– नष्टीकरण केलेली रद्दी विकणेकरिता निवीदा मागविण्याबाबत...**

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, जिल्हा अभिलेखागृह,वाशिम येथील कार्यालयीन रद्दी विकत घेणेकरिता खालील अटी व शर्तीवर निवीदा मागविण्यात येत आहेत.

१. निवीदा धारकाने कार्यालयीन रद्दी विकत घेणेकरिता आपली निवीदा सर्व कर, किंमती व अटीसह दिनांक १२/०४/२०२४ रोजी किंवा तत्पूर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे नांवे या कार्यालयास बंद लिफाफ्यामध्ये सादर करावी तसेच बंद लिफाफ्यावर रद्दी विकत घेण्याबाबत निवीदा असे ठळक अक्षरात नमुद करावे.

२. निवीदा भरतांना सुरक्षा निधी म्हणून रु.२०००/– चा धनाकर्ष (Bank Draft) मा.अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश–१, वाशिम यांचे नावाने सादर करावा. धनाकर्षाशिवाय सादर करण्यात आलेली निवीदा अवैध ठरविण्यात येईल.

३. निवीदा धारकाने निवीदा सादर करतांना बंद लिफाफ्यामध्ये त्यांचे स्वत:चे छायाचित्र असलेले आधारकार्ड/पॅनकार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना इत्यादींची स्वसाक्षांकित झेरॉक्स प्रत जोडणे अनिवार्य राहील. निवीदेमध्ये स्वत:चा भ्रमणध्वनीक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

४. निवीदा मंजूरीनंतर संबंधीत निवीदा धारकाने रद्दीचे मोजमाप करण्यापूर्वी या कार्यालयास रु. १५०००/– ची अनामत रक्कम भरणे बंधनकारक राहील. ज्यांची निवीदा मंजूर होईल त्यांनी रद्दी मोजून घेण्याकरिता तराजू वजन काटा व सर्व माल भरण्याकरिता पोत्यांची व्यवस्था करुन तो माल येथून नेण्याची व्यवस्था करावी. कोणतीही निवीदा कारण न दाखविता नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहील.

वाशिम
दिनांक ०२/०४/२०२४

सहाय्यक अधिक्षक
जिल्हा अभिलेखागृह
जिल्हा न्यायालय, वाशिम

अधिक्षक
वित्त विभाग
जिल्हा न्यायालय, वाशिम

प्रतिलिपी:— १. वि.जिल्हा न्यायालय, वाशिम यांचे नोटीस बोर्डावर
२. जिल्हा न्यायालय, वाशिम या कार्यालयाच्या संकेतस्थळावर
३ .वि.जिल्हाधिकारी, कार्यालय, वाशिम
४. वि.तहसिल कार्यालय, वाशिम